# नांदेड महानगरपालिकेची अंतिम प्रभाग रचना निश्चित

नांदेड/प्रतिनिधी



नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेचा प्रभाग रचनेचा निवडणूक कार्यक्रम निश्चित झाला होता, त्यानुसार निवडणूक आयोगाने आक्षेप निकाली काढत ९२ सदस्यांची प्रभाग रचना निश्चित करून राज्य शासनाच्या राजपत्रात अधिसुचना प्रसिद्ध केली आहे. त्यामुळे आता नगरसेवकांनी निवडणुकीच्या कामाला लागण्यासाठी प्रभाग निश्चित झाले आहेत.

नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका काँग्रेसच्या ताब्यात आहे. परत मनपावर काँग्रेसची सत्ता यावी यासाठी काँग्रेसकडून नियोजन केले जात आहे. प्रभाग रचना निश्चित नसल्यामुळे या कामी गती येत नव्हती. राज्य निवडणूक आयोगाने मनपाच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी प्रभाग रचना १३ जून रोजी प्रसिद्ध करून त्याच्या हरकती व सुचना मागविल्या होत्या. विहीत कालावधीमध्ये प्राप्त हरकती व सुचनावर सुनावणी होऊन अहवाल राज्य निवडणूक आयोगास सादर करण्यात आला होता. सदर अहवालाची तपासणी करून राज्य निवडणूक आयोगातर्फे अंतिम प्रभाग रचनेची अधिसुचना दि. १९ जुलै रोजी शासन राजपत्रात प्रसिद्ध केली आहे. सदर अधिसुचना नागरिकांना पाहण्यासाठी संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

प्रभाग क्र. १ तरोडा खुर्द येथून प्रभाग रचना सुरू आहे. प्रभाग क्रमांक १ ते ३० मध्ये तीन सदस्य आहेत. तर प्रभाग क्र. ३१ मध्ये दोन सदस्य आहेत, असे एकूण ९२ सदस्य असणार आहेत. प्रभागनिहाय आरक्षण सुटणे अजून बाकी आहे. प्रभाग निश्चित झाल्यामुळे अनेकजण आता निवडणुकीच्या कामाला लागले आहेत. ऑक्टोबर २०२२ मध्ये महानगरपालिकेची मुदत संपणार होती. त्यानुसार निवडणुक आयोगाने कार्यक्रम निश्चित केला आहे.

## महानगरपालिकेमधील सध्यस्थितीतील पक्षीय बलाबल

काँग्रेस - ७३, भाजप - ६, शिवसेना - १, अपक्ष - १ असे एकूण ८१ सदस्य आहेत. तर स्वीकृत सदस्य ५ आहेत. नव्या प्रभाग रचनेमुळे नगरसेवकांची संख्या ८१ वरून ९२ वर पोहचली आहे.

# मनपाची अंतिम प्रभाग रचना जाहीर

लोकमत न्यूज नेटवर्क

नांदेड : नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेची अंतिम प्रभाग रचना राज्य निवडणूक आयुक्त यु.पी.एस. मदान यांनी जाहीर केली आहे. प्रारुप प्रभाग रचनेच्या ६६ पैकी ५५ आक्षेपांना सुनावणी घेण्यात आली होती.

महापालिकेतील नगरसेवक आणि पदाधिकाऱ्यांचा कार्यकाळ येत्या ऑक्टोबर महिन्यात संपत आहे. त्या अनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने गुगल मॅपद्वारे प्रभाग रचनेचा प्रारुप आराखडा तयार केला होता. सध्या महापालिकेत ३० प्रभागातून ८१ सदस्य निवडून आले आहेत. मात्र आगामी निवडणुकीत वाढीव लोकसंख्येच्या आधारावर ३१ प्रभागातील ९२ सदस्य निवडले जाणार आहेत.

महिनाभरापूर्वी निवडणूक आयोगाने प्रारूप प्रभाग रचना जाहीर करून त्यावर आक्षेप आणि हरकती मागवल्या होत्या. त्यात ५८ जणांनी ६६ आक्षेप दाखल केले होते. त्यातील ५५ जणांचे आक्षेपावर पुणे येथील समाजकल्याण विभागाचे आयुक्त प्रशांत ननवरे यांच्या अधिपत्याखाली सुनावणी घेण्यात आली होती. नागरिक, लोकप्रतिनिधींच्या आक्षेपांवर त्यांचे समाधान करण्यात आले. त्यानंतर मंगळवारी अंतिम आराखडा जाहीर करण्यात आला.

पान ४

## निवडणूक आयोगाकडून अधिसूचना जारी

# महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर

नांदेड (प्रतिनिधी)–नांदेड वाघाळा शहर महापालिकेची – अंतिम प्रभागरचना राज्य निवडणूक आयुक्त यु.पी.एस. मदान यांनी जाहीर केली आहे. दरम्यान दि. ४ जुलै रोजी प्रारुप प्रभाग रचनेच्या ६६ पैकी ५५ जणांच्या आक्षेपांवर सुनावणी झाली. हा अहवाल निवडणूक आयोगाकडे सादर झाल्यानंतर आयुक्तांनी मंगळवार दि. १९ जुलै रोजी अधिसूचना जारी केली आहे.

नांदेड वाघाळा शहर महापालिकेतील पदाधिकाऱ्यांचा पाच वर्षाचा कार्यकाळ येत्या ऑक्टोबर महिन्यात संपत आहे. त्याअनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने गुगलमॅपद्वारे महापालिकेच्या प्रभागरचनेचा प्रारूप आरा खडा दि. १३ जून रोजी प्रसिद्ध केला होता. सध्या महापालिकेत ३० प्रभागातून ८१ सदस्य निवडून आले आहेत. मात्र ऑक्टोबर २०२२ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत वाढीव लोकसंख्येच्या आधारावर ३१ प्रभागात ९२ सदस्य निवडले जाणार आहेत. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने महिनाभरापूर्वी महापालिकेच्या प्रारुप नगररचना जाहीर करून यावर हरकती व आक्षेप मागवले होते. जारी झालेल्या प्रारूप रचनेवर ५८ जणांनी ६६ आक्षेप दाखल केले होते. यातील ५५ जणांच्या आक्षेपावर पुणे येथील समाजकल्याण विभागाचे आयुक्त प्रशांत ननवरे यांच्या अधिपत्याखाली आणि जिल्हाधिकारी डॉ. विपिन, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने व अन्य काही अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महापालिकेत काही दिवसांपूर्वी सुनावणी घेण्यात आली. हा अहवाल समाजकल्याण आयुक्तांमार्फत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आला होता. या अहवालाच्या निरीक्षणानंतर राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त यु.पी.एस. मदान यांनी महापालिकेची अंतिम प्रभागरचना जाहीर केली आहे. यासंदर्भात अधिसूचनाही जारी करण्यात आली आहे.

पुढारी

# पाच प्रभागांची नावे, दोनची भौगोलिक क्षेत्रे बदलली

## महानगरपालिका निवडणुकीचा अंतिम प्रभाग आराखडा जाहीर

**नांदेड, पुढारी वृत्तसेवा : महानगरपालिकेच्या आगामी सार्वत्रिक निवडणुकीसाठी राज्य निवडणूक आयोगाने अंतिम प्रभाग आराखडा मंगळवारी जाहीर केला आहे. प्रारूप आराखड्यावर एकूण ६४ आक्षेप घेण्यात आले होते. यापैकी आयोगाने पाच प्रभागांची नावे आणि दोन प्रभागांचे भौगोलिक क्षेत्र बदलले असून उर्वरित सर्व आक्षेप फेटाळून लावले आहेत.**

नांदेड महापालिकेची मुदत ऑक्टोबर महिन्यात संपत असून त्यापूर्वी निवडणुका घेणे आवश्यक आहे. यंदा लोकसंख्येनुसार ११ वॉर्डांची भर पडली असून वॉर्डांची एकूण संख्या ९२ झाली आहे. यावेळी त्रिसदस्यीय रचना राहणार असल्याने प्रत्येक मतदाराला एकाचवेळी तीन उमेदवारांना मतदान करण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. तीन वॉर्डांचा एक प्रभाग या प्रमाणे ३० प्रभाग आणि दोन वॉर्डांचा एक प्रभाग असे एकतीस प्रभाग निर्माण करण्यात आले आहेत.

### सप्टेंबर महिन्यात लागू होऊ शकते आचारसंहिता?

**अंतिम प्रभाग आराखडा जाहीर झाल्यानंतर प्रभाग आरक्षण सोडत आणि मतदार यादी कार्यक्रम कोणतेही विघ्न न येता ठरलेल्या वेळेत ही प्रक्रिया पूर्ण झाल्यास सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात निवडणुकीची आचारसंहिता लागू होऊ शकते. सन २०१७ साली झालेल्या निवडणुकीची आचारसंहिता ५ सप्टेंबर रोजी लागू करण्यात आली होती. १६ ते २३ सप्टेंबरदरम्यान उमेदवारी अर्ज दाखल करण्यात आले होते. तर ११ ऑक्टोबर रोजी मतदान होऊन १२ ऑक्टोबर रोजी मतमोजणी पार पडली होती.**

महानगरपालिकेने निवडणूक आयोगाला पाठविलेल्या डाटानुसार आयोगाने गुगल मॅपद्वारे प्रभाग रचनेच्या भौगोलिक सीमा निश्चित केल्या आहेत. हा प्रारूप आराखडा महापालिकेच्या निवडणूक विभागाने जाहीर केल्यानंतर या आराखड्यावर दि. २४ जूनपर्यंत आक्षेप आणि हरकती स्वीकारण्यात आल्या होत्या. प्राप्त झालेल्या ६४ आक्षेप आणि हरकती महापालिकेने निवडणूक आयोगाला पाठविल्या होत्या. या आक्षेपांवर निवडणूक आयोगाने मोहर उमटवली असून पाच प्रभागांची नावे बदलली तर दोन प्रभागांची हद्दवाढ बदलण्यात मान्यता दिली आहे. रामरहिम प्रभागाचे नाव चौफाळा, ब्रह्मपुरीचे नाव ईदगाह, नांदेड हौसिंग सोसायटीचे गणेशनगर, बेलानगरचे तरोडा (बु.) असे नवे नामकरण केले आहे. या शिवाय सिद्धनाथपुरी प्रभागाला करबला तर माणिकनगर प्रभागाला बेलानगरचा काही भाग जोडला आहे.

प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा तयार करताना भौगोलिक सलगता राहील, प्रभागाच्या सीमारेषा, मोठे रस्ते, गल्ल्या, नद्या, नाले, डोंगर, रस्ते, उड्डाणपूल या नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चिती करावी. कोणत्याही परिस्थितीत एका इमारतीचे, घराचे विभाजन दोन प्रभागामध्ये होणार याची दक्षता घ्यावी, अशी मार्गदर्शक तत्त्वे निवडणूक आयोगाची आहेत. या तत्त्वांचे पूर्णपणे पालन करून प्रभाग रचना निर्माण करण्यात आली असल्याने या मार्गदर्शक तत्त्वांवर कोणताही आक्षेप घेण्यात आला नव्हता.

### आता लक्ष प्रभाग आरक्षण सोडतीकडे

**राज्य निवडणूक आयोगाने अंतिम प्रभाग आराखडा जाहीर केल्यानंतर पुढील आठवड्यात निवडणुकीचा पुढचा टप्पा म्हणून प्रभाग आरक्षण सोडत जाहीर केली जाऊ शकते. यानंतर सूचना व हरकतीसाठी दोन दिवसांची मुदत देऊन आरक्षण सोडत अंतिम करण्यात येईल, हे अधिकार महानगरपालिकेच्या निवडणूक विभागाकडे आयोगाने दिले आहेत. तसेच एक ऑगस्टपासून मतदार यादी कार्यक्रम राबविला जाण्याची शक्यता आहे.**

# मनपाची अंतिम प्रभाग रचना जाहीर

## निवडणूक विभागाकडून अधिसूचना जारी

**नांदेड/ प्रतिनिधी**

नांदेड वाघाळा शहर महापालिकेची अंतिम प्रभागरचना राज्य निवडणूक आयुक्त यु.पी. एस. मदान यांनी जाहीर केली आहे. दरम्यान दि. ४ जुलै रोजी प्रारूप प्रभाग रचनेवरील ६६ पैकी ५५ जणांच्या आक्षेपांवर सुनावणी झाली. हा अहवाल निवडणूक आयोगाकडे सादर झाल्यानंतर आयुक्तांनी मंगळवारी दि. १९ जुलै रोजी अधिसूचना जारी केली आहे.



नांदेड वाघाळा शहर महापालिकेतील पदाधिकाऱ्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ येत्या ऑक्टोबर महिन्यात संपत आहे. त्याअनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने गुगल मॅपद्वारे महापालिकेच्या प्रभागरचनेचा प्रारूप आराखडा दि. १३ जून रोजी प्रसिद्ध केला होता. सध्या महापालिकेत ३० प्रभागातून ८१ सदस्य निवडून आले आहेत. मात्र ऑक्टोबर २०२२ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत वाढीव लोकसंख्येच्या आधारावर ३१ प्रभागात ९२ सदस्य निवडले जाणार आहेत. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने महिनाभरापूर्वी महापालिकेचा प्रारुप नगररचना जाहीर करुन त्याबाबत हरकती व आक्षेप मागविले होते. जारी झालेल्या प्रारुप रचनेवर ५८ जणांनी ६६ आक्षेप दाखल केले होते. यातील ५५ जणांच्या आक्षेपावर पुणे येथील समाजकल्याण विभागाचे आयुक्त प्रशांत नरनवरे यांच्या अधिपत्याखाली आणि जिल्हाधिकारी डॉ. विपिन इटनकर, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने व अन्य काही अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महापालिकेत काही दिवसांपूर्वी सुनावणी घेण्यात आली. हा अहवाल समाजकल्याण आयुक्तांमार्फत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आला होता. या अहवालाच्या निरीक्षणानंतर राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त यु.पी.एस. मदान यांनी महापालिकेची अंतिम प्रभागरचना जाहीर केली आहे. यासंदर्भात अधिसूचनाही जारी करण्यात आली आहे.

---

### नांदेड वाघाळा शहर महापालिका २०२२ सार्वत्रिक निवडणूक

# प्रभाग रचनेची अंतिम प्रारुप अधिसूचना प्रसिध्द



## ५ ठिकाणच्या प्रभागाची नावे बदलली तर काही प्रभागाच्या भागात केला बदल

देशोन्नती वृत्तसंकलन...

**नांदेड** ▪ नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका २०२२ च्या सार्वत्रिक निवडणुकीची अंतिम प्रभाग रचनेची अधिसूचना मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांनी प्रसिध्द केली. ५ प्रभागाची नावे बदलण्यात आली तर काही प्रभागाच्या भागातही बदल करण्यात आला आहे.

मनपाच्या सार्वत्रिक निवडणुकीची पहिली प्रारुप अधिसूचना १३ जून रोजी प्रसिध्द केली होती. या प्रारुप अधिसूचनेवर २४ जुलैपर्यंत ६६ आक्षेप दाखल झाले होते. या आक्षेपांवर पुण्याचे समाजकल्याण तथा प्राधिकृत अधिकारी डॉ.प्रशांत नारनवरे, राज्य निवडणूक आयुक्त अविनाश सनस, विभागीय उपायुक्त पांडुरंग कुलकर्णी, जिल्हाधिकारी डॉ.विपीन इटनकर, मनपा आयुक्त डॉ.सुनिल लहाने यांच्या उपस्थितीत ५ जुलै रोजी आक्षेपावर सुनावणी घेण्यात आली. या समितीने महापालिकेच्या प्रभाग रचनेची अंतिम प्रारुप अधिसूचना जाहिर केली, त्यात प्रभाग क्र.२ हा पूर्वी कैलासनगर, अरुणोदय नगर या नावाने जाहिर करण्यात आला होता. येथे बदल करण्यात आला असून तरोडा बु.नावाने प्रसिध्द करण्यात आला आहे. प्रभाग क्र.३ पूर्वी माणिकनगर-तरोडा बु.या नावाने जाहिर झाला होता. आता त्यात बदल करुन कैलासनगर, माणिकनगर या नावाने प्रसिध्द केला आहे. प्रभाग क्र.८ पूर्वी नांदेड हाऊसिंग सोसायटी या नावाने जाहिर झाला होता, त्यात बदल करुन आता हा प्रभाग गणेशनगर या नावाने प्रसिध्द झाला आहे. प्रभाग क्र. १४ शिवनगरच्या पूर्वीच्या हद्दीमध्ये बदल करण्यात आला आहे तर प्रभाग क्र.१५ टाऊन मार्केटच्या हद्दीमध्ये बदल करण्यात आला आहे.

प्रभाग क्र. १७ पूर्वी हा अम्बपुरी नावाने प्रकाशित करण्यात आला होता, आता त्यात बदल करुन इदगाह नावाने प्रसिध्द करण्यात आला. प्रभाग क्र.१९ पूर्वी हा रहमतनगर नावाने प्रसिध्द करण्यात आला होता, त्यात बदल करुन आता चौफाळा या नावाने प्रसिध्द करण्यात आला आहे.

### आता लक्ष प्रभागाच्या आरक्षणावर

महापालिकेची प्रभाग रचनेची अंतिम प्रारुप अधिसूचना मंगळवारी राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेने आयुक्त डॉ. सुनिल लहाने यांनी प्रसिध्द केली आहे. ३१ प्रभागातून ९२ सदस्य निवडून जाणार आहेत. आता अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीचे आरक्षण कोणत्या प्रभाग सुटते, त्याकडे सर्वांचे लक्ष राहणार आहे.

# महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर

## आयुक्तांकडून अधिसूचना; ३१ प्रभागांत ९२ सदस्य राहणार



नांदेड, ता. १९ (बातमीदार) : नांदेड - वाघाळा महापालिकेची अंतिम प्रभागरचनेची अधिसूचना मंगळवारी (ता. १९) आयुक्त डॉ. सुनील लहाने यांनी जाहीर केली. याबाबत ता. चार जुलै रोजी प्रारूप प्रभाग रचनेच्या आक्षेप आणि हरकतींवर सुनावणी झाली होती. त्याचा अहवाल निवडणुक आयोगाकडे सादर झाल्यानंतर राज्य निवडणुक आयुक्त यु. पी. एस. मदान यांनी अंतिम प्रभाग रचना जाहीर केली आहे.

महापालिकेची पाच वर्षाची मुदत येत्या ऑक्टोबर महिन्यात संपत आहे. त्यामुळे राज्य निवडणुक आयोगाने प्रभाग रचनेचा प्रारूप आराखडा ता. १३ जुन रोजी प्रसिद्ध केला होता. सध्या महापालिकेत ३० प्रभाग असून त्यातून ८१ नगरसेवक निवडून आले आहेत. आता नवीन रचनेनुसार ३१ प्रभाग आणि ९२ नगरसेवक निवडले जाणार आहेत. त्यासाठी राज्य निवडणुक आयोगाने महिन्याभरापूर्वी प्रारूप प्रभाग रचना जाहीर करून त्यावर ता. २४ जूनपर्यंत आक्षेप व हरकती मागविण्यात आल्या होत्या. त्यानुसार एकूण ५६ जणांनी ६६ आक्षेप व हरकती दाखल केल्या होत्या. या आक्षेपामध्ये काही भाग वगळणे तर काही नवे भाग जोडण्यात यावेत, यासाठीची मागणी करण्यात आली होती. त्यावर ता. चार जुलै रोजी सुनावणी घेण्यात आली. त्यासाठी प्राधिकृत अधिकारी म्हणून पुणे येथील समाजकल्याण विभागाचे आयुक्त प्रशांत नारनवरे उपस्थित होते. त्याचबरोबर समिती सदस्य म्हणून राज्य निवडणुक विभागाचे प्रतिनिधी श्री. जाधव, विभागीय आयुक्त कार्यालयातील उपायुक्त पांडुरंग कुलकर्णी, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर आणि आयुक्त डॉ. सुनील लहाने यांची उपस्थिती होती. सुनावणीनंतर त्याचा अहवाल राज्य निवडणुक आयोगाकडे सादर करण्यात आला. त्यानंतर राज्य निवडणुक आयोगाने अंतिम प्रभाग रचना तसेच अधिसूचनाही जारी केली आहे.



प्रजावाणी

# प्रभाग रचनेचे ६६ पैकी ५१ आक्षेप फेटाळले

## चार प्रभागातील पाच प्रगणक गटांची अदलाबदल

नांदेड, दि. १९ : येत्या ऑक्टोबर महिन्यात नियोजित असलेल्या महापालिका निवडणुकीसाठी ३१ प्रभागांची अंतिम रचना आणि नकाशे मंगळवारी (दि. १९) राज्य निवडणूक आयोगाने प्रसिद्ध केले आहेत. प्रारूप प्रभाग रचनेवर प्राप्त झालेल्या ६६ पैकी केवळ १५ जणांचे आक्षेप मान्य करण्यात आले असून उर्वरित ५१ आक्षेप फेटाळण्यात आले आहेत. मान्य केलेल्या आक्षेपात सात प्रभागांचे नावे बदलण्यात आली असून तीन प्रभागांच्या व्याप्ती आणि हद्दीत दुरुस्ती करण्यात आली आहे. चार प्रभागांमधील पाच प्रगणक गटांची अदलाबदल करण्यात आली आहे.

महापालिकेचे सध्या ४ सदस्यीय २० प्रभाग आणि ८१ सदस्य आहेत. शासनाने घेतलेल्या निर्णयानुसार सदस्यांची संख्या ८१ हून वाढून ९२ झाली आहे. तसेच तीन सदस्यीय ३० आणि दोन सदस्यीय एक या प्रमाणे ३१ प्रभागांची प्रारूप अधिसूचना गेल्या १३ जून रोजी महापालिकेने प्रसिद्ध केली होती. त्यावर २४ जूनपर्यंत प्राप्त झालेल्या ६६ आक्षेपांवर ४ जुलै रोजी प्राधिकृत अधिकारी तसेच समाज कल्याण आयुक्त डॉ. प्रशांत नारनवरे यांनी सुनावणी घेऊन राज्य निवडणूक आयोगाला आपला अहवाल सादर केला होता.



सात प्रभागांच्या नावात बदल, तीन प्रभागांच्या व्याप्तीत दुरुस्ती

**प्रभागाच्या नावात बदल**

| [illegible] | [illegible] | [illegible] |
|---|---|---|
| २ | बेलानगर/अरुणोदयनगर | तरोडा (बु.) |
| ३ | बेलानगर | बेलानगर/माणिकनगर |
| ८ | हाऊसिंग सोसायटी | गणेशनगर |
| १७ | ब्रम्हपुरी | [illegible] |
| १९ | रामरहिमनगर | चौफाळा |
| २० | सिद्धनाथपुरी | सिद्धनाथपुरी/करबला |
| २७ | खडकपुरा | खडकपुरा |

प्राप्त आक्षेपांमध्ये प्रभाग रचनेवरील सर्वाधिक आक्षेपांचा समावेश होता. त्यातील केवळ ४ प्रभागातील प्रगणक गटांची अदलाबदल करण्याचे आक्षेप मान्य झाले आहेत. प्रभाग १५ - टाऊन मार्केटमधील मुस्लीमबहुल परिसराचा एक प्रगणक गट प्रभाग क्रमांक १४-शिवनगरला जोडण्यात आला आहे. प्रभाग क्र. १९ मधील चार प्रगणक गट प्रभाग क्र. २० मध्ये समाविष्ट करण्यात आले आहेत. त्यामुळे या चारही प्रभागातील लोकसंख्येत सुधारणा झाल्याचे सूत्रांनी सांगितले.

प्रभागाच्या नावात बदल करण्याचे १३ आक्षेप दाखल झाले होते. हे सर्व आक्षेप मान्य करण्यात आले आहेत. काही आक्षेप घेणाऱ्यांनी प्रभागाच्या नावासाठी एकापेक्षा अधिक नावांचा पर्याय सुचविला होता. त्यातील एक पर्याय मान्य झाला आहे. प्रभाग २२ -इतवारामध्ये साईनगरचा आणि प्रभाग १९ - जुना रामरहिमनगर व नवीन चौफाळा नावाच्या प्रभागात शिवनगर व शांतीनगर या भागाचा उल्लेख व्याप्तीमध्ये करण्याचा आक्षेप मान्य झाला आहे. प्रभाग क्र. ६-भाग्यनगरच्या चतुःसिमेत प्रभाग ७ मधील समाविष्ट केलेल्या निजाम कॉलनी भागाच्या व्याप्तीत नकाशाप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली आहे.

# महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर

## निवडणूक आयोगाकडून अधिसूचना जारी

**नांदेड : प्रतिनिधी**



नांदेड - वाघाळा शहर महापालिकेची अंतिम प्रभागरचना राज्य निवडणूक आयुक्त यु.पी. एस. मदान यांनी जाहीर केली आहे. दरम्यान दि.४ जुलै रोजी प्रारुप प्रभाग रचनेच्या ६६ पैकी ५५ जणांच्या आक्षेपांवर सुनावणी झाली. हा अहवाल निवडणूक आयोगाकडे सादर झाल्यानंतर आयुक्तांनी मंगळवार दि.१९ जुलै रोजी अधिसूचना जारी केली आहे.

नांदेड वाघाळा शहर महापालिकेतील पदाधिकाऱ्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ येत्या ऑक्टोबर महिन्यात संपत आहे. त्याअनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने गुगलमॅपद्वारे महापालिकेच्या प्रभागरचनेचा प्रारुप आराखडा दि.१३ जून रोजी प्रसिद्ध केला होता. सध्या महापालिकेत ३० प्रभागातून ८१ सदस्य निवडून आले आहेत. मात्र ऑक्टोबर २०२२ मध्ये होणाऱ्या निवडणुकीत वाढीव लोकसंख्येच्या आधारावर ३१ प्रभागात ९२ सदस्य निवडले जाणार आहेत. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने महिनाभरापूर्वी महापालिकेच्या प्रारुप नगररचना जाहीर करुन यावर हरकती व आक्षेप मागवले होते. जारी झालेल्या प्रारुप रचनेवर ५८ जणांनी ६६ आक्षेप दाखल केले होते. यातील ५५ जणांच्या आक्षेपावर पुणे येथील समाजकल्याण विभागाचे आयुक्त प्रशांत ननवरे यांच्या अधिपत्याखाली आणि जिल्हाधिकारी डॉ.विपिन, महापालिका आयुक्त डॉ.सुनील लहाने व अन्य काही अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महापालिकेत काही दिवसांपूर्वी सुनावणी घेण्यात आली. हा अहवाल समाजकल्याण आयुक्तांमार्फत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आला होता.

या अहवालाच्या निरीक्षणानंतर राज्य निवडणूक आयोगाचे आयुक्त यु.पी.एस. मदान यांनी महापालिकेची अंतिम प्रभागरचना जाहीर केली आहे. यासंदर्भात अधिसूचनाही जारी करण्यात आली आहे.

---

# महापालिकेची अंतिम प्रभाग रचना जाहीर



## ३१ प्रभागांतून निवडणार ९२ नगरसेवक

**नांदेड, दि. १९ :** महापालिकेची अंतिम प्रभागरचना राज्य निवडणूक आयुक्त यु. पी. एस. मदान यांनी आज जाहीर केली.

गेल्या दि. ४ जुलै रोजी प्रारुप प्रभाग रचनेच्या ६६ पैकी ५५ जणांच्या आक्षेपांवर सुनावणी झाली. हा अहवाल निवडणूक आयोगाकडे सादर झाल्यानंतर निवडणूक आयुक्तांनी आज अधिसूचना जारी केली. महापालिकेत सध्या ३० प्रभागातून ८१ सदस्य निवडून आलेले आहेत. ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीत वाढीव लोकसंख्येच्या आधारावर ३१ प्रभागात ९२ सदस्य निवडले जाणार आहेत. महापालिका पदाधिकाऱ्यांचा पाच वर्षांचा कार्यकाळ येत्या ऑक्टोबरमध्ये संपत आहे. त्याअनुषंगाने राज्य निवडणूक आयोगाने गुगलमॅपद्वारे प्रभागरचनेचा प्रारुप आराखडा दि. १३ जून रोजी प्रसिद्ध केला होता. सध्या महापालिकेत ३० प्रभागातून ८१ सदस्य निवडून आले आहेत. ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या निवडणुकीत वाढीव लोकसंख्येच्या आधारावर ३१ प्रभागात ९२ सदस्य निवडले जाणार आहेत. यासाठी राज्य निवडणूक आयोगाने महापालिकेच्या प्रारुप नगररचना जाहीर करून यावर हरकती व आक्षेप मागवले होते. जारी झालेल्या प्रारुप रचनेवर ५८ जणांनी ६६ आक्षेप दाखल केले होते. यातील ५५ जणांच्या आक्षेपावर पुणे येथील समाजकल्याण विभागाचे आयुक्त प्रशांत ननवरे यांच्या अधिपत्याखाली आणि जिल्हाधिकारी डॉ. विपिन ईटनकर, महापालिका आयुक्त डॉ. सुनील लहाने व अन्य काही अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत महापालिकेत काही दिवसांपूर्वी सुनावणी घेण्यात आली. हा अहवाल समाजकल्याण आयुक्तांमार्फत राज्य निवडणूक आयोगाकडे सादर करण्यात आला होता. या अहवालाच्या निरीक्षणानंतर राज्य निवडणूक आयुक्त यु. पी. एस. मदान यांनी महापालिकेची अंतिम प्रभागरचना जाहीर केली आहे. यासंदर्भात अधिसूचना जारी करण्यात आली आहे.